सोमवार दि.११ नोव्हेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ६५

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# राजकारण कारल्याच्या भाजीसारखे कडू झाले आहे-संभाजीराजेंचा हल्लाबोल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक (वृत्तसंस्था)**

राजकारण कारल्याच्या भाजीसारखे कडू झाले आहे, असे म्हणत स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी सर्व पक्षांवर जोरदार टीका केली. नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघातील स्वराज्य पक्षाचे उमेदवार दशरथ पाटील यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत संभाजीराजे बोलत होते. या सभेत त्यांनी महाविकास आघाडी आणि महायुतीवरही टीका केली.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले की, आजचे राजकारण आजवर कधीच बघितले नव्हते. येथे खोके, गद्दारी, आणि बेईमानी सुरू आहे. बाळासाहेब ठाकरे नेहमीच म्हणायचे की शिवसेना काँग्रेसशी युती करणार नाही. मग उद्धव ठाकरे काँग्रेससोबत कसे गेले? खुर्चीसाठी असा निर्णय घेतला असेल, तर ते गद्दारी नाही का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.संभाजीराजे पुढे म्हणाले, पंतप्रधान मोदी ७० हजार कोटींचा आरोप करत होते. आज त्याच अजित पवारांसोबत सरकार आहे. सोनिया गांधी यांच्या परदेशीचा मुद्दा घेऊन शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले, नंतर पुन्हा त्यांच्यासोबतच गेले. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आंबेडकर यांचे नाव घ्यायचे पण तसे आपण वागतो का? आमच्याकडे शिवाजी महाराजांचा स्वाभिमान आहे.पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे शस्त्र तलवार होते. आता बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले 'पेन' शस्त्र आपल्यासोबत आहे. महात्मा फुलेंची सामाजिक रचना, बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेचा विचार आणि या पेनच्या शाईमधून शिवाजी महाराजांचे विचार लिहिले जातात. महाराष्ट्र इतरांना दिशा देणारे राष्ट्र आहे. पण, या सर्व प्रस्थापितांनी महाराष्ट्र गिळून टाकला आहे.सदाभाऊ खोत यांच्यावर देखील संभाजीराजे यांनी टीका केली आहे. तो सदाभाऊ खोत काहीही बोलतो, त्याला उत्तर देणार तो कुत्रा आहे म्हणतो, हा प्रचार आहे का? असा सवाल उपस्थित केला. महायुती १५०० रुपये देतात, महाविकास आघाडी ३ हजार देणार म्हणतात, त्यापेक्षा महिलांना रोजगार द्या, असे म्हणत त्यांनी महायुती आणि महाविकास आघाडीवर टीका केली आहे.



माध्यमिक आश्रम शाळा नाईकनगरहर्डल्स ४०० मीटर या प्रकारामध्ये

# मुलीतून कु.वैष्णवी नामदेव आयलवाड ही द्वितीय आली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदपूर । प्रतिनिधी**

माध्यमिक आश्रम शाळा नाईकनगर या शाळेतील मुलगी विभागीय मैदानी स्पर्धा२०२४-२०२५ नांदेड येथे दि.०६/११/२०२४ रोजी सदरील शाळेतील १७ वर्ष वयोगट मुली हर्डल्स ४०० मीटर या प्रकारामध्ये मुलीतून

कु.वैष्णवी नामदेव आयलवाड ही द्वितीय आली राज्य स्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली

झाले यशाबद्दल कोच श्री.भाग्येशभैय्या आरदवाड सर,श्री.कराडसर ,श्री.चव्हानसर श्री.दिनकर गुट्टे सर, श्री.अरविंद डोईफोडे सर, व सर्व खेळाडू व स्पर्धेस साहाय्य करणारे सर्व कोच सर्वांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री शिवाजीराव विठ्ठलराव भिकाने साहेब संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ.मुद्रीकाताई भिकाणे मॅडम, संस्थेचे सचिव श्री सचिनराव भिकाने साहेब, संस्थेचे सहसचिव डॉक्टर श्री शशिकिरन भिकाणे साहेब शाळेचे मुख्याध्यापक श्री झाडे सर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शन करणारे सर्व कोच सर्वांचे अभिनंदन करून राज्य स्तरीय मैदानी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी घेतले श्री रेणूका मातेचे दर्शन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार भाजप नेते अशोकराव चव्हाण यांनी दि.१०नोव्हेंबर रोजी माहूरगडला भेट देऊन श्री रेणुका देवीचे दर्शन घेऊन पूजा/अर्चा केली.दर्शनानंतर संस्थान कार्यालयात संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी,बाळू कान्नवं, शुभम भोपी यांनी शालश्रीफळ देवून त्यांचे स्वागत केले. यावेळी पुजारी भवांनीदास भोपी व्यवस्थापक योगेश साबळे यांची उपस्थिती होती.

संस्थानच्या पायथ्याशी श्री रेणूका माऊली व्यापारी असोसिएशनचे सल्लागार वसंत कपाटे,उपाध्यक्ष गोविंद आराध्ये, संजय आराध्ये,विकास कपाटे,आर्दश विध्वंस जगदिश आराध्ये सह इतर सर्व व्यापारी वर्ग यांनी खासदार अशोकराव चव्हाण यांचा सत्कार केला.या वेळी उपस्थित माजी नगराध्यक्ष प्रा.राजेंद्र केशवे,भाजप तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर,माजी जि.प.सदश्य संजय राठोड, किशोर जगत,नगरसेवक गोपू महामुने, दिलीप मुनगीलवार, दत्तात्रय शेरेकर, पुरुषोत्तम लांडगे,पदमजा गिऱ्हे,रेहमत भाई,फिरोज खान पठाण,दीपक मुरादे,निखिल शिंदे सह असंख्य भाजप कार्यकर्ते व अशोकराव चव्हाण यांना मानणारा वर्ग उपस्थित होता होते.



# उमरी येथील अमित देशमुख यांच्या सभेमुळे प्रा.रविंद्र चव्हाण व डॉ मिनलताई खतगावकर यांचे पारडे जड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

नांदेड लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार प्राध्यापक रवींद्र चव्हाण व नायगाव विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ मिनल खतगावकर यांच्या प्रचारार्थ शनिवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी बारा वाजता उमरी येथे काँग्रेसचे नेते माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची जाहिर सभा झाली असता सभेस संबोधित करीत असताना आ . अमित देशमुख म्हणाले की, महाराष्ट्राला अडचणीतून आपल्याला बाहेर काढायचे हे काम करण्यासाठी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणे आवश्यक आहे. आज राज्यातील परिस्थिती पाहत असताना शेतकऱ्याच्या शेतीमालाला भाव नाही..दिवसेन दिवस महागाई वाढत आहे.. येणाऱ्या काळात जर ही परिस्थिती बदलायची असेल तर त्यासाठी आपल्याला महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे लागेल असे काँग्रेसचे स्टार प्रचारक माजी मंत्री अमित देशमुख यांनी उपस्थित मतदार बंधू-भगिनींना संबोधित केले.

या जाहीर सभेस माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, मा. मंत्री डॉ माधवराव किनाळकर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, भास्कर पाटील भिलवंडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर शिरीष देशमुख गोरठेकर , कैलास देशमुख गोरठेकर ( जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक) जिल्हा अध्यक्ष बी, आर कदम, माजी आ. अविनाश घाटे हाणमंतराव पाटील चव्हाण, श्रीनिवास चव्हाण,विजय चव्हाण , बाळासाहेब पाटील खतगावकर, रवी पाटील खतगावकर, रेखाताई बाळासाहेब पाटील गोळेगावकर गणेशराव पाटील करखेलीकर प्रल्हाद पा. इज्जतगावकर काँ पक्ष उमरी तालुकाध्यक्ष) बालाजी पाटील सावंत , ( शिवसेना ता. प्रमुख उमरी) यासह नायगाव मतदारसंघातील महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# ओंकार महेश बिंगेवार याची बॉक्सिंग क्रीडा प्रकारात राज्यस्तरावर निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**

माहूर तालुक्यातील वझरा (शेख फरीद ) येथील कै. गोविंदराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता ११ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी ओंकार महेश बिंगेवार याने बॉक्सिंग क्रीडा प्रकारात विभागीय स्तरावर प्रथम क्रमांकासहसुवर्ण पदक मिळवले असून त्याची बॉक्सिंग या क्रीडा प्रकारात राज्यस्तरावर निवड झाली आहे. ओंकार ने यापूर्वी जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग, बॉक्सिंग, किक बॉक्सिंग क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांकासह सुवर्ण पदक पटकावले आहे. ओंकार बिंगेवार यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव बालाजीराव पांडागळे पाटील, शाळेचे प्राचार्य संजय फड, शिक्षक साईनाथ नागरगोजे, सुनील फड, जोशी व शाळेतील कर्मचारी आदींच्या उपस्थित शाळेच्या वतीने गौरव करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दरबार ए शायरी

आज ते संविधान आपुले
हाती प्रत्येकाच्या दिसले !
आता बस अवलोकन त्याचे
हातासरसे करून घ्यावे !!
ऐक्य देशाचे फोडून
काल कृत्येच करणाऱ्या !
कथित त्या राजकारण्यांनी
एकदा समजून ते घ्यावे !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे,
ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

स्वप्न अन वास्तव यातील
फरक जाणता यायला हवा
तरच सापडेल जीवनी
प्रगतीचा मार्ग नवा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# मतदानाला राहिले ९ दिवस उमेदवारांच्या कोपरासभा,गावभेटी दौऱ्यावर भर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**कंधार । धोंडीबा मुंडे**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा रणसंग्राम सुरु आहे.या निवडणुकीसाठी लोहा-कंधार मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलेच तापु लागले आहे,तालुक्यात उमेदवारांचा कोपरासभा,गावभेट दौऱ्यावर भर दिला,या मतदारसंघामध्ये विधानसभा १४ उमेदवार रणांगणात आहेत.यामध्ये ८ अपक्ष उमेदवार आहेत.विशेषता एकाच नावाचे ४ नावे सारखीच असल्यामुळे मतदार ही बुचकळ्यात पडणार का असा प्रश्न निर्माण पडला आहे.ही खेळी कोणत्या उमेदवाराने तयार केली यांचीही चर्चा होत आहे.सध्या प्रत्येक पक्षाचे नेते अपक्ष उमेदवार,कार्यकर्ते फोडण्यासाठी जोर लावत आहेत.

यासोबतच जे मोठे गावे आहेत, मतदारसंघाला बहुरंगी लढतीचे स्वरूप आल्याने प्रत्येक मत महत्त्वाचे आहे.या मानसिकतेतून कार्यकर्ते, शहर गल्लीतील,गावपातळीतील नेत्यांकडे 'खास' लक्ष देण्याची महत्त्वाची जबाबदारी उमेदवारांनी आपल्या विश्वासू साथीदारांवर टाकली आहे.

कोणत्याही परिस्थितीत आपला विजय पक्का व्हावा, यासाठी कोणत्याही स्वरूपाची रसद मतदारांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी या साथीदारांच्या खांद्यावर टाकल्याने अशा महत्त्वाच्या साथीदारांचे फोन २४ तास 'बिझी' झाले आहेत,विरोधी उमेदवाराचे कच्चे दुवे शोधून त्यावर धोरणात्मक हल्ला कधी चढवायचा, याची रणनीती आखली जात असून ते व्हायरल कसे आणि कधी करायचे,यासाठी यंत्रणा कामाला लावण्यात आल्याचे दिसते. आपली पडती बाजू भक्कम करून विरोधकांवर हल्ले करण्याबरोबर पक्षातील वरिष्ठांची मर्जी सांभाळत मतदारांच्या हाकेला साद घालण्याचे कौशल्य उमेदवारांचे मुत्सद्दी साथीदार या ०९ दिवासांत करणार असल्याचे उमेदवारांचे निकटवर्ती सांगतात. या सर्व गोष्टी करून विजयाचे तोरण बांधण्यासाठी प्रत्येक उमेदवाराकडे वेळ कमी आणि कामांची यादी लांब असल्याने त्यांचा ताळमेळ कसा घालायचा,यावर प्रत्येक मतदारसंघात मंथन सुरू आहे.ग्रामीण भागात गाव, वाड्या पालथ्या घालून मतदारांच्या मनाचा ठाव घ्यायचा आहे.शहरी भागात रोज किमान दहा सोसायट्यांतील मतदारांशी व्यक्तिगत संपर्क होईल, यादृष्टीने नियोजन केले जात आहे.

त्यासाठी दिवसांचे तास कमी पडत आहेत.साधारण ०३ लाख मतदार एका विधानसभा मतदारसंघात येतात. त्यात पन्नास टक्के महिला,तर पन्नास टक्के पुरुष मतदार गृहीत धरून तसे प्रचाराचे नियोजन केले जात आहे.



## संपादकीय..

# वांद्रे टर्मिनस चेंगराचेंगरी; हतबल प्रशासन




किमान दहा लोक जखमी झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत दोन जण गंभीर जखमी झाले असून, या घटनेवर आता राजकारण सुरू झाले आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी वाहतूक ओव्हरफ्लो होती आणि त्यात दिवाळीच्या सुट्टीनिमित्त गावी जाणाऱ्या लोकांची प्रचंड गर्दी होती. त्यातच मुंबईच्या अति बंदोबस्त असलेल्या वांद्रे टर्मिनस येथे रविवारी चेंगराचेंगरीची भयंकर दुर्घटना घडली. त्यात किमान दहा जण किरकोळ जखमी झाले, तर दोन जण अतिगंभीर आहेत. इतक्या जीवघेण्या गर्दीतही प्रवाशांनी चालत्या गाडीत चढण्याचा प्रयत्न केला आणि ते या दुर्घटनेचे शिकार झाले. घाटकोपरकडे जाणाऱ्या ट्रेनला पकडण्यासाठी भयंकर गर्दीत प्रवाशांनी प्रयत्न केला आणि या घटनेत भयंकर अफरातफरी माजली. या घटनेचा व्हीडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. स्थानकावर प्रचंड गोंधळ माजला होता आणि त्यातच ही दुर्घटना घडली. दिवाळी आणि त्यापाठोपाठ येणाऱ्या छट पूजा सणानिमित्त प्रवाशांची स्थानकात तुफान गर्दी झाली होती. अनेक प्रवाशांनी आपल्या जागा आरक्षित केल्या नव्हत्या आणि त्यांनाच या गर्दीचा सर्वात जास्त फटका बसला. वांद्रे–घाटकोपर अयोध्या एक्स्प्रेस ही गाडी फलाट क्रमांक १ वरून वांद्रे टर्मिनसच्या यार्डमध्ये चालली होती. ही गाडी ५–१० वाजता येथून सुटणार होती. पण सणासुदीच्या दिवसांत प्रवासी आरक्षित डब्यांमध्ये बसूनही प्रवास करण्याचा प्रयत्न करतात असे अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रवासी पळत होते, काही जण जखमी झाले होते. त्यापैकी काही जण तर अति गंभीर होते. एका माणसाला रक्तस्त्राव होत असल्याचे व्हीडिओमधून दिसले. आता या घटनेवरून राजकारण सुरू झाले आहे. एक तर महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होत आहे आणि त्यात विरोधी पक्ष सरकारला या घटनेवरून घेरण्याची संधी सोडणार नाही हे स्पष्टच आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना घेरण्याचा प्रयत्न केला आणि त्यांनी म्हटले आहे की, वैष्णव हे सध्या बुलेट ट्रेनमध्ये गुंतले असल्याने मुंबईच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नात लक्ष घालण्यास त्यांना सवड नाही. आदित्य ठाकरे यांनी वैष्णव यांच्या असे अपघात टाळण्याच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पण ते विसरतात की, त्यांचे सरकार असताना कित्येक प्रकल्प तेव्हाच्या सरकारने बासनात गुंडाळून ठेवले होते. मेट्रो प्रकल्प असाच आता रेल्वे प्रशासनाने फलाटांच्या तिकिटांची विक्री करण्यासाठी काही नियम घालून दिले आहेत. पण त्यासाठी काही लोकांना चेंगराचेंगरीत जखमी व्हावे लागले. ही दुर्घटना घडल्यावर सीएसटी, दादर, कुर्ला आणि एल टीटी, कल्याण तसेच पुणे आणि नागपूर स्थानकांवर तिकीट विक्रीसंबंधी काही निर्देश लागू करण्यात आले आहेत. पण याचा अर्थ बैल गेला आणि झोपा केला असा होईल.

सणानिमित्त प्रचंड गर्दी आहे आणि रेल्वे प्रशासनाकडे इतक्या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही. त्यामुळे आता प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी तिकीट काऊंटरवर तात्पुरते बंधन लादण्यात आले आहे. याचा काही उपयोग होईल असे वाटत नाही पण निदान मनुष्यहानी तरी होणार नाही. सेंट्रल रेल्वेकडून जारी केलेल्या एका पत्रकात माहिती देण्यात आली आहे की, फलाट तिकिटे ही सीएसएमटी, दादर, कुर्ला आणि एलटीटी आदी स्थानकांवर विक्री करण्यात येतील पण त्यांच्या संख्येवर काही निर्बंध घालण्यात येतील. हे निर्बंध गर्दीचे व्यवस्थापन करण्यास सहाय्यभूत होतील यात काही शंका नाही. वास्तविक रेल्वे प्रशासनाने ही उपाययोजना अगोदरच करायला हवी होती. पण रेल्वने तसे केले नाही ही वस्तुस्थिती आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचा अर्थ असा होतो की, हवशे–गवशे आणि नवशांना तिकीट आता विक्री केली जाणार नाही. आता हे कसे ठरवणार हा प्रश्नच आहे. मात्र वृद्ध व्यक्ती आणि आजारी माणसाना यातून सुट्टी देण्यात आली आहे. याचे एक कारण असे सांगण्यात येते की, अनेक जण फलाट तिकीट काढून रेल्वे डब्यांतील आपल्या आसनापर्यंत पोहोचवण्यासाठी येतात. त्यांची काहीच गरज नसते. पण गर्दीचे योग्य नियोजन आणि सुसूत्रता राखण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. ८ नोव्हेंबरपर्यंत फलाट तिकिटाच्या विक्रीस बंदी घालण्यात आली आहे. दिवाळी आणि छट पूजेनिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी होत आहे. छट पूजेनिमित्त बिहार आणि उत्तर प्रदेशात जाणाऱ्या प्रवाशांची प्रचंड गर्दी होते.

वास्तविक आता रेल्वेची व्यवस्था उत्तम झाली आहे. अपघातांची संख्या रोडावली आहे. पूर्वीसारखे अपघात होत नाहीत. पण रेल्वे प्रशासनाची काही मजबुरी आहे आणि त्यात समावेश आहे तो अपुऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांचा. या पूर्वी अनेक घटना घडल्या आहेत. ज्यांनी अनेक जणांचा बळी घेतला आहे आणि त्यात एलफिन्स्टन रोज स्थानकावरील चेंगराचेंगरीचा समावेश आहे. यापेक्षाही अनेक घटना आहेत. याची काही खास कारणे आहेत ती म्हणजे एक तर प्रचंड गर्दी आहे आणि दुसरे म्हणजे स्थानके अत्यंत अरुंद जागेत आहेत. फूट ओव्हर ब्रिजेसवर एका वेळेस प्रचंड संख्य़ेने लोक सामील होतात. रेल्वे प्रशासनाने यावर काही उपाययोजना शोधली पाहिजे. यात हवामानाच्या स्थितीचा अनेकदा परिणाम होतो. रेल्वेने यासाठी काही तरी ठोस उपाययोजना केली पाहिजे. सर्वसामान्य मुंबईकर गर्दीचे व्यवस्थापन नीटरीत्या होण्यासाठी रेल्वेकडून वाट पाहत आहेत. चेंगराचेंगरीच्या दुर्घटना यासाठी घडतात कारण गर्दी त्यांच्या क्षमतेच्या बाहेर जाते आणि ती एकाच दिशेने जाण्याचा प्रयत्न करू लागते. कोणतेही प्रशासन यासाठी हतबल ठरते पण विरोधकांना राजकारण करण्याशिवाय दुसरा इलाज नसतो. कारण त्यांना गर्दीला उत्तर द्यायचे असते. पण रेल्वे प्रशासन असो अथवा अन्य कोणतीही यंत्रणा असो. या परिस्थितीत ती हतबलच ठरते. वांद्रे टर्मिनस येथील दुर्घटना ही याचेच उदाहरण आहे.

# सुखी जीवन जगण्याचा सोप्पा मार्ग कोणता? सकरात्मक वृत्तीचा किती फरक पडतो?



'आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चोहीकडे!' या बालकवींच्या मन प्रफुल्लित करणाऱ्या गीताचे शब्द लतादीदींच्या सुमधुर स्वरात जेव्हा कानावर पडतात, तेव्हा खरोखर जीवन हे आनंद गाणे असून ते 'गातची रहावे' असेच वाटत राहते. माणसाचे आयुष्य सुखावह होण्यासाठी त्याने आपले जगणे हे आनंदी वृत्तीने जगले पाहिजे. अर्थात, माणसाच आयुष्य हे सुखदुःख, यश अपयश, आशा निराशा, अकल्पित संकटे, अडचणी यांनी भरलेले असते. सहजासहजी सुखावह जीवन जगणे हे कोणालाच शक्य नसते. जीवनातल्या प्रतिकूलतेवर, बिकट परिस्थिवर मात करत आनंदाने जगणे ही एक कला आहे व ती आत्मसात करणं मनुष्याला जमायला हवं. तेव्हाच जगणं हे आनंदगाणे होते.

सुख, शांती, समाधान, आनंद, प्रसन्नता... हे जगण्याचे आनंदगाणे करणारे प्रमुख घटक. असा आनंद प्राप्त झाला की तो चेहऱ्यावर उतरून चेहरा समाधानाने, प्रसन्नतेने उजळतो. या अंतर्यामीच्या आनंदी, समाधानी वृत्तीने मनुष्य काही तरी गुणगुणायला लागतो. ही आनंदी वृत्ती चित्तात ठसली पाहिजे किंवा असली पाहिजे. तेव्हाच मनुष्य प्रतिकूल, बिकट परिस्थितीवर मात करत जीवन आनंदाने जगू शकतो वा जगण्याचे आनंदगाणे करू शकतो. त्यासाठी सकारात्मक वृत्ती हवी.

स्वभाव सकारात्मक असेल तर मनुष्य अगदी लहानसहान, किरकोळ गोष्टींतून आनंद वेचून मजेत जगू शकतो. जीवनाचा उपभोग घेत असताना अनेक घटकांतून, प्रसंगातून दाही दिशांत पसरलेला आनंद शोधून तो टिपकागदाप्रमाणे टिपायची वृत्तीही असली पाहिजे किंवा तशी सवय लागली पाहिजे. आनंद शोधणे, तो टिपणे, लुटणे.. ही एक संधीच असते. या आनंदात इतरांनाही सामील करून घेता आले पाहिजे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नुकतेच निधन पावलेले रतन टाटा यांचे आदर्श जीवन चरित्र किंवा जीवनशैली! 'जगणे व्हावे गाणे' हे आपल्या आनंदी, समाधानी वृत्तीतून व साध्या राहणीतून, निर्मळ, निकोप आचारविचारातून, सामाजिक योगदानाच्या कृतीतून, निसर्ग, प्राणीप्रेमातून रतन टाटा शिकवून गेले.सुदैवाने, आपल्या मराठी संगीत प्रांतात चित्तवृत्ती प्रसन्न करणारी, मनावर आनंदसरींचा वर्षाव करणारी अनेक दर्जेदार आनंदगाणी, कविता, श्लोक, अभंग, भारूड अशा अवीट गोडीच्या रचना आहेत. ती ऐकून आपण जीवनावर प्रेम करू लागतो. 'या जगण्यावर शतदा प्रेम करावे!' हे सकारात्मक वृत्तीचे गाणे त्यांचे प्रातिनिधिक उदाहरण ठरावे. निसर्ग अवलोकन, साहित्य रसास्वाद, संगीत, नृत्य, नाटक आदी कला व क्रीडा यांची आवड व्यक्तीच्या जीवनात आनंद फुलवते. दर्जेदार विनोद, किस्से ऐकून मनावरील ताणतणाव क्षणात दूर होऊन मन हलकेफुलके होते. लहान मुलांचे खेळ बघताना त्यात रममाण झाल्याने वेदना, चिंता विसरल्या जाऊन आनंदाची अनुभूती येते. कुंडीत रोवलेल्या रोपाला जेव्हा फूल येते तेव्हाचा आनंद तर अवर्णनीय व अनुपमेय असाच असतो. रोजच्या जीवनातील अशा अनेक आनंददायी प्रसंगातून जीवन गाणे समृद्ध होते.या व्यतिरिक्त अशा काही कृतिशील गोष्टी आहेत की त्या केल्याने इतरांच्या जीवनातही आनंद फुलू शकतो. परोपकारासारखा दुसरा आनंद नाही. विशेषतः कोणी दुःख संकटात, अडचणीत असताना त्याला आर्थिक तसेच शारीरिक मदत जगणे समृद्ध करते. निकोप यशाबद्दल दुसऱ्याचे अभिनंदन करणे, त्याचे कौतुक करणे, अनोळखी व्यक्तीचे स्मितहास्याने स्वागत करणे अशा लहानसहान प्रसंगांतून जीवनातील आनंदबागा फुलवता येतात.जगणे हेच एक आनंदगाणे होण्यासाठी मात्र माणसाला काही गोष्टींचे अवधान राखावे लागते. काही नियमांच पालन करावे लागते. सकारात्मक वृत्ती, स्वयंशिस्त, विचारांची निश्चित बैठक, कोणत्या न कोणत्या कार्यात स्वतःला गुंतवून ठेवणे, अशी जीवनधारणा असेल तरच जगणे आनंदगाणे होईल.

# विमान प्रवासात धमक्या का येतात?

आज जग हे एक जागतिक खेडे आहे. विमान वाहतूक या खेड्याचा एक अविभाज्य भाग आहे. विमान वाहतूक अतिशय वेगाने वाढते आहे. भारतातसुद्धा गेल्या काही वर्षांत नागरी हवाई वाहतूकसेवा क्षेत्रात अभूतपूर्व वाढ झाली आहे, हे प्रवाशांसाठी होणारा विमान कंपन्यांचा विस्तार आणि उड्डाणांच्या वाढत्या संख्येवरून दिसून येते. हवाई वाहतूक सुरक्षा हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. ज्यावर या क्षेत्राची उपयुक्तता आणि पुढली वाढ अवलंबून आहे. 'एव्हिएशन सेफ्टी' ही एक व्यापक प्रकल्पना आहे जी हवाई क्षेत्र, विमाने, विमानतळ, हवाई वाहतूक, उड्डाण दिक्चालन (नेव्हिगेशन), आणि सार्वजनिक सुविधांसह सहाय्यक सुविधांसाठीच्या सुरक्षा गरजांचा समावेश करते. भारतात विमान वाहतुकीच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची आहे.




खोटी 'बॉम्बस्फोटाची' धमकी हे देशातील विमानसेवा विस्कळीत करण्याचे आणि सेवा प्रदाते आणि प्रवासी या दोघांवरही प्रचंड मानसिक दबाव निर्माण करण्याचे एक साधन आहे. अशा धमक्या सामान्यत: ई–मेल किंवा समाज माध्यमातून येतात, कारण अशा प्रणाल्या वापरण्यास स्वस्त आणि एक निनावी साधन म्हणून अत्यंत उपयोगी पडतात. संदिग्ध बॉम्ब धमकी ही विमानात किंवा विमानतळावर बॉम्ब असल्याच्या खोट्या माहितीद्वारे दिली जाते. अलीकडे भारताच्या हवाई वाहतूक क्षेत्राला येणाऱ्या खोट्या धमक्यांच्या संख्येत चिंताजनक वाढ झाली आहे. अवघ्या १५ दिवसांत विविध भारतीय विमान कंपन्यांच्या तीनशेहून अधिक खोट्या बॉम्बस्फोटाच्या धमक्या मिळाल्या. यामुळे भारताचे विमान वाहतूक क्षेत्र नुस्तचेच अस्थिर आणि विचलित झाले नसून, अनिश्चितता आणि आर्थिक तणावाने पण ग्रासले गेले आहे. देशांतर्गत आणि आंतरदेशीय अशा दोन्ही प्रकारच्या उड्डाणांना अशा खोट्या धमक्या मिळाल्या. आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्ये अमेरिका, कॅनडा, सिंगापूर आदी विविध देशांकडे जाणाऱ्या भारतीय विमान उड्डाणांचा समावेश आहे. .

विशेष म्हणजे उड्डाणादरम्यान मोठ्या प्रमाणात बॉम्बस्फोट घडवून आणण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. उड्डाण चालू असताना असणाऱ्या स्फोटाच्या धोक्यामुळे विमान त्वरित जवळच्या विमानतळाकडे वळवणे भाग पडते. असे विमानतळ अनेकवेळा इच्छित गंतव्यस्थानापासून बरेच दूर असू शकते. उदाहरणार्थ, काही दिवसांपूर्वी अमेरिकेला जाणाऱ्या एअर इंडियाचे विमान धमकीनंतर कॅनडाला वळवावे लागले, तर फ्रँकफर्टला जाणारे विस्तारा एयरलाइन्सचे विमान तुर्कस्तानकडे वळवण्यात आले. कधी कधी एखादा देश बॉम्ब धमकीग्रसित विमानाच्या आपत्कालीन लँडिंगला परवानगी नाकारू शकतो. मग सुरक्षा परिस्थिती आणखी गुंतागुंतीची होऊ शकते. अफगाणिस्तान हा एक असा देश आहे ज्याने बॉम्बच्या धोक्याचा सामना करत असलेल्या भारतीय विमानाला 'डायव्हर्जन' (आपत्कालीन वळण) सुविधा नाकारली होती.उड्डाणात अशा धमक्या देणाऱ्यांना हे माहीत असावे की अशावेळी विमान नजीकच्या विमानतळाकडे वळविणे मोठ्या खर्चाचे असते. यात धोका असणाऱ्या विमानांना एस्कॉर्ट करण्यासाठी लढाऊ विमाने पाठविणे, विमान अनियोजित विमानतळावर उतरल्यानंतर प्रवासी व सामानाची व्यापक तपासणी करणे आणि जादा खानपानाची सोय करणे अशा अनेक गोष्टी असतात. अनेकवेळा वेळ वाढल्याने एअरलाईन क्रू बदलणे (कार्यवेळ जास्त झाल्यामुळे), अतिरिक्त देखभाल, तसेच प्रवाशांसाठी अधिक सुविधा पुरविणे पण आवश्यक होते व खर्च वाढतो.

एका बॉम्बस्फोटाच्या धमकीमुळे विमान कंपनीला तीन कोटीरुपयांहून अधिक नुकसान होऊ शकते असा अंदाज काही सरकारी / विमान कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. बॉम्बस्फोटाच्या या खोट्या धमक्यांमुळे संबंधित विमान कंपन्यांचे एकूण आर्थिक नुकसान ३००–३५० कोटी रुपयांच्या आसपास झाल्याचा अंदाज आहे. शिवाय, इंधनाच्या नासाडीमुळे एकूण इंधन खर्च आणि पर्यावरणाचे नुकसान या दोन्हींत भर पडली आहे. एकंदरीत, या फसव्या धमक्यांनी केवळ मोठ्या प्रमाणात विमान सेवांमध्ये व्यत्यय आणला नसून प्रवाशांचा हवाई सुरक्षेवरील विश्वासही कमी केला आहे. भारतीय अधिकारी / एअरलाइन्सच्या अधिकाऱ्यांनी असा संशय व्यक्त केला आहे की अशा फसव्या धमक्यांचे हेतू दुर्भावनापूर्णता, स्वतःकडे लक्ष वेधून घेणे, मानसिक आरोग्याच्या समस्या किंवा केवळ खोडकरपणा असू शकतो. काही हवाई सुरक्षा अधिकाऱ्यांनी धमक्या कशा दिल्या जात आहेत याचा एक आराखडा सांगितला आहे. सुरुवातीला ईमेलचा वापर करून किंवा फोन कॉलद्वारे एकच धमकी देण्यात येते. एकदा यंत्रणा कामाला लागली की अल्पावधीत अशा अनेक धमक्या समोर येतात. हा एक सुनियोजित आणि समन्वित कृतीचा भाग आहे, असे निदर्शनास आले आहे. या फसवणुकीमागचा नेमका हेतू अद्याप निश्चित झाला नसला तरी हवाई वाहतूक क्षेत्राला अडचणीत आणणे, दहशत निर्माण करणे आणि सर्व संबंधित यंत्रणांना धारेवर धरणे हा नक्कीच त्यांचा हेतू आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

कारणे काहीही असोत, धमक्यांसाठी जबाबदार व्यक्तींचा शोध घेणे सोपे नाही. ईमेल (बहुतेक देशाबाहेरून), एक्स, व्हॉट्सॲप सारख्या सोशल मीडिया आणि दूरध्वनीद्वारे धमक्या मिळाल्याचे निष्पन्न झाले आहे. आधुनिक लपवाछपवीच्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आय–पी ओळख (ईमेलसाठी) निश्चित करणे कठीण झाले आहे. तसेच, एक्स आणि व्हॉट्सअपच्या सेवा देणाऱ्याने सूत्रे उघड करण्यास नकार दिल्याने सोशल मीडियावरील गुन्हेगारांचा शोध घेणे पण कठीण झाले आहे. ह्या असहकार्यामुळे हा पूर्वनियोजित कट असल्याचा संशय बळावला आहे. पोलिस तपासात एका अल्पवयीन मुलाला (मनोरुग्ण) नागपूर येथून तसेच एका लेखनिकाला गोंदिया येथून अटक झाली आहे. पण तपासाअंती हे आढळून आले आहे की बहुतांशी ई–मेल या इंग्लंडमधून पाठवण्यात आल्या आहेत. सध्या इंग्लंड सदस्य असलेल्या '५–आइज' देशांचा भारताला बदनाम करण्याचा उद्देश उघडकीस आला आहे. पुढील तपास सत्य पुढे आणेल, अशी अशा आहे. भारतीय विमान सेवांना अजूनही धोका आहे. त्यामुळे सध्या तरी भारताने प्रत्येक धमकीला खरे मानण्याची व गाफीलपणा होऊ न देण्याची आत्यंतिक गरज आहे. कारण गुन्हेगार अशा गाफिलपणाची वाट पाहत असू शकतात आणि भारताला खऱ्या अर्थाने 'कनिष्क' प्रकारचे नुकसान पोहोचविण्याच्या तयारीत असू शकतात. भारत सरकारने वारंवार येणाऱ्या या धमक्यांची गंभीर दखल घेतली असली तरी गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी अधिक कडक कायदे आणणे, राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रकरणांमध्ये समाज माध्यमांना स्रोत उघड करणे बंधनकारक करणे आणि ईमेल स्रोतांचा शोध घेण्यासाठी डिजिटल देखरेख क्षमता अद्ययावत करणे आवश्यक आहे. हवाई वाहतूक सुरक्षा सुधारण्यासाठी आपल्या सर्व योजना प्रभावी हव्यात. सून त्झूने म्हटल्याप्रमाणे 'आपल्या योजना रात्रीसारख्या गडद आणि अंधकारमय असाव्यात, पण आपण जेव्हा प्रहार करू तो मात्र वज्राघाताप्रमाणे असावा.' सर्व यंत्रणांनी हे आपले ब्रीदवाक्य म्हणून जपले पाहिजे.

# डॉ.बाबासाहेब देशमुख यांची सांगोला विधानसभा मतदारसंघात मोठी सुनामी

## कटफळ येथील शिवसेना शिंदे गटाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा शेकाप मध्ये प्रवेश..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते डॉक्टर बाबासाहेब देशमुख व डॉक्टर अनिकेत देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कटफळ येथील शिवसेनेच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनीप्रवेश केला आहे. डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत कटफळ येथील सोसायटीचे माजी चेअरमन उत्तम बंडगर, माजी उपसरपंच बाबासो बंडगर, विजय बंडगर, बाळासो बंडगर, औदुंबर धांडोरे, समाधान खरात यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेने शिंदे गटातून शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. पक्ष नेतृत्वाच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराला कंटाळून शिवसेना ( शिंदे गट) पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब देशमुख व डॉ.अनिकेत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी शेकाप मध्ये प्रवेश केला. शिवसेना शिंदे गटाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी प्रवेश केल्याने विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना कटफळ गावातून विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार शेकाप मध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. सांगोला विधानसभा मतदारसंघांमध्ये गेल्या पाच वर्षांमध्ये जो अनागोंदी कारभार सुरू आहे त्यामुळे जनता प्रस्थापितांना वैतागलेले असून त्यामुळे शेतकरी कामगार पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश होत आहेत. शेतकरी कामगार पक्षाने गेल्या पाच वर्षाच्या काळात अनेक गोष्टींना वाचा फोडला आहे गोरगरीब सर्वसामान्य जनतेसाठी रस्त्यावर उतरून वेळप्रसंगी आंदोलने ही केली आहेत त्यामुळे सर्वसामान्य जनतेमधून शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या बद्दल मोठी सहानुभूती दिसून येत असल्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत देखील शेतकरी कामगार पक्षाचा दणदणीत विजय होणार असल्याचे प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

# संविधानाचा अपप्रचार करणाऱ्या मविआच्या नेत्यांना आयोगाने संविधानाच्या गैरवापरास बंदी घालावी-भाजपा गटनेते आ.दरेकर

## संविधान भाजपसाठी सर्वोच्च ;पवित्र असा राष्ट्रीय धर्मग्रंथ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक । प्रतिनिधी**



लोकसभा निवडणुकीत संविधानाचा खोटा नरेटिव्ह सेट करून दिशाभूल करणारा अपप्रचार केला. आता पुन्हा विधानसभेच्या निवडणुकीत अशाच प्रकारे अपप्रचार करून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करत मतदान मिळवता येईल या उद्देशाने राहुल गांधी आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांचे काम सुरू आहे. हातातील संविधानाच्या पुस्तिकेचा आपल्या राजकीय स्वार्थासाठी ते वापर करत असून पवित्र अशा संविधानाचा वापर करण्यास निवडणूक आयोगाने त्यांच्यावर बंदी घालावी, अशी मागणी भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी केली. ते नाशिक येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना दरेकर म्हणाले की, लोकसभेत जनतेची दिशाभूल झाली हे निवडणुकीनंतर स्पष्ट झाले. संविधान हा भाजपासाठी सर्वोच्च पवित्र असा राष्ट्रीय धर्मग्रंथ असून त्याला कधीही आम्ही धक्का लावू देणार नाही, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिलीय. उलटपक्षी काँग्रेसने १०७ वेळा घटना दुरुस्ती करत केवळ आपली सत्ता टिकवण्यासाठी घटनेचा ढाचा बदलण्याचे पाप केलेय. आज संविधानाच्या नावाने पुन्हा एकदा खोटी संविधानाची पुस्तिका घेऊन जो अपप्रचार होतोय त्याला बंधन लागले पाहिजे. काँग्रेस, मविआकडे आता कुठल्याही प्रकारचे मुद्दे नाहीत. महाविकास आघाडीचा अडीच वर्षाचा कालावधी आणि एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील दोन वर्षाचा कालावधी याची तुलना विकासाच्या दृष्टीने केली तर पूर्णपणे अपयशी ठरलेले महाविकास आघाडीचे सरकार दिसेल. उद्धव ठाकरे यांनी प्रकल्पांना केवळ स्थगिती देण्याचे काम केले आणि महाराष्ट्राचा विकास ठप्प करून ठेवला. दुसरीकडे शिंदेंच्या नेतृत्वाखाली सरकार असल्याने प्रगती गतीने होतेय. दोन वर्षात रेकॉर्डब्रेक अशा प्रकारचे निर्णय महायुती सरकारने घेतलेले दिसतील. दरेकर पुढे म्हणाले की, सर्वाधिक लोकप्रिय ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना. या योजनेच्या माध्यमातून महायुती सरकारतर्फे १५००रूपये बहिणींना प्रती महिना दिले जातात. यामुळे सर्वसामान्य बहिणीच्या आयुष्यात मोठा हातभार, दिलासा मिळतोय. ही योजना आली, लोकप्रिय झाली आणि महाविकास आघाडीचे धाबे दणाणले असल्याचा टोलाही दरेकरांनी लगावला. तसेच या योजनेच्या विरोधात विरोधकांनी अपप्रचार सुरू केला. योजनेसाठी पैसे कुठून आणणार विचारू लागले. एका बाजूला योजनेला विरोध करणार आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्या वचननाम्यात दीड हजाराचे ३ हजार देणार. मग तुम्ही काय पैशाचा पाऊस पाडणार आहात का? असा सवालही दरेकरांनी उपस्थित करत याच महिला भगिनी आपला आशीर्वाद महायुतीला देऊन पुन्हा वाढीव रक्कमेसहित आपल्याला मिळणारी रक्कम शाश्वत करणार असल्याचा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला. दरेकर पुढे म्हणाले की, महिला, युवकांसह शेतकऱ्यांनाही आपण मदत करतोय. वीजबिल माफीचा कृषी पंपाचा निर्णय फडणवीसांनी घेतला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ६ सिंचन प्रकल्पाना सुप्रमा होत्या. पाटबंधारेमध्ये जवळपास १०६ सुप्रमांना फडणवीसांनी मंजुरी देत गती दिली. हे सरकार कामगार, रिक्षा वाले, गरिबांसाठी काम करतेय. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक या सरकारच्या माध्यमातून राज्यात येतेय. ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात झालीय. त्यामुळे जनतेच्या आशा वाढल्या असून दोन वर्षात प्रगतीकडे जाणारा आपला महाराष्ट्र आणखी गतीने पुढे जावा यासाठी महाराष्ट्रातील जनता निश्चितपणे आम्हाला पाठबळ देईल, असा विश्वासही दरेकरांनी व्यक्त केला.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार नवाब मलिक यांच्या रॅलीवर बोलताना दरेकर म्हणाले की, अजित पवार त्यांच्या पक्षाचे पक्षप्रमुख आहेत. नवाब मलिक यांना त्यांच्या पक्षाने उमेदवारी दिलेली आहे. महायुती म्हणून भाजपने आपली भुमिका स्पष्ट केलेली आहे. महायुतीचे, भाजपा म्हणून मलिक यांना आमचे समर्थन नाही. आम्ही त्यांचा प्रचारही करणार नाही. याबाबत देवेंद्र फडणवीस यांनीही भुमिका स्पष्ट केली आहे.

# शिवसेनेच्या विद्यमान ग्रामपंचायत सदस्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा शेकाप मध्ये प्रवेश

## डॉ.बाबासाहेब देशमुख यांचा विजय निश्चित; सगळीकडे शिट्टीचा बोलबाला



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकोप्याने विचार विनिमय करून निर्णय घेतात. सर्व कार्यकर्ते सुद्धा प्रत्येक निर्णयामध्ये सहभागी असल्यामुळे पक्षाचे काम मोठ्या प्रमाणात वाढत चालले आहे. सांगोला तालुक्यात आगामी विधानसभा निवडणुकीत लाल बावटा फडकवण्याचा संकल्प महुद बु येथील शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी केला. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते डॉक्टर बाबासाहेब देशमुख व डॉक्टर अनिकेत देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून महुद बु येथील विद्यमान ग्रामपंचायत सदस्य सौ.सुनिता संजय कोळेकर व संजय नारायण कोळेकर यांनी शिंदे गटातून असंख्य कार्यकर्त्यासह शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी डॉ बाबासाहेब देशमुख यांनी सर्वांचे स्वागत करून शेतकरी कामगार पक्षात आपणास योग्य तो मानसन्मान दिला जाईल असे आश्वासन देवून सर्वांचे स्वागत केले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते व पुरोगामी युवक संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विधानसभा निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना महुद भागातून विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.स्वर्गीय भाई गणपतराव देशमुख यांनी जपलेले व रुजवलेले पुरोगामी विचार प्रत्यक्षात लोकांच्या मनामनात पोहोचवणारा शेतकरी कामगार पक्ष हा सत्य आणि वास्तव आहे. सर्व सामान्य नागरिक यामुळे डॉ.बाबासाहेब देशमुख व डॉ. अनिकेत देशमुख यांच्या पाठीशी आजही तेवढ्याच ताकतीनिशी सोबत असल्याचे दिसून येते. सांगोला तालुक्यात सर्व समाजात लोकप्रिय असणाऱ्या व सर्वांना सामावून घेऊन पुढे जाणाऱ्या शेतकरी कामगार पक्षासाठी काम करण्याची संधी मिळाली असून शेतकरी कामगार पक्षाचा लालबावटा या तालुक्यावर पुन्हा फडकविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात आले.आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सांगोला विधानसभा मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांना निवडणूक शिट्टी चिन्हं बहाल करण्यात आले असून सांगोला तालुक्यात शिट्टीचा आवाज घुमू लागला आहे. लहान मुलापासून ते वयोवृद्ध नागरिकांकडे शिट्टी दिसून येत असून शिट्टीचा आवाज मोठ्या प्रमाणात घुमू लागला आहे.

# महाविकास आघाडीच्या सौ.अनुराधा नागवडे यांच्या प्रचाराच्या दरम्यान शिवसेना नेते खा.राऊत यांची तोफ कडाडली

## पंतप्रधान,मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री,यांच्यावर खासदार राऊत यांची टीका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**



गुजरातच्या २ व्यापाऱ्यांनी महाराष्ट्राचे वाटोळे करण्यासाठी आधी शिवसेना नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला उद्धव ठाकरे यांचे सरकार पडले आता तीच मंडळी श्रीगोंदा मतदार संघात एक अधिकृत तर एक अनधिकृत उमेदवार उभे करून सत्ता मिळवू पाहत आहेत त्यांना रोखण्यासाठी राज्यात लोकांनी महा विकास आघाडीला साथ देण्याचे ठरवले आहे तुम्ही देखील सौ. अनुराधा नागवडे यांना विजयी करून सरकार आणण्यात भाग घ्या असे आवाहन शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी तालुक्यातील वांगदरी येथे महा विकास आघाडी उमेदवार सौ अनुराधा नागवडे यांच्या प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना केले. अध्यक्ष स्थानी शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा.शशिकांत गाडे होते. आपल्या खास शैलीत भाजप आणि अपक्ष उमेदवारांवर टीका करताना खा.राऊत म्हणाले स्व.शिवाजीराव नागवडे यांनी साडे सात वर्षे आमदार असताना मतदार संघाचे रूप पालटले पण विरोधी आमदारांनी ४० वर्ष प्रश्न प्रलंबित ठेवले तर अपक्ष उमेदवाराने आमदार असताना रस्ते केले नाहीत आता ते रोड रोलर घेऊन निघाले आहेत रोड रोलर चा स्पीड सगळ्यांना ठाऊक आहे रोड रोलर रस्त्यातील खड्ड्यात अडकून पडेल .त्यांनी शेतकऱ्यांचे पैसे थकवले त्यांना पक्ष कसा उमेदवारी देईल असा सवाल केला . यावेळी बोलताना उमेदवार सौ.अनुराधा नागवडे यांनी भाजप आणि अपक्ष उमेदवार वर चौफेर टीका करत उपस्थितांना विचार करण्यास भाग पाडले सौ.नागवडे म्हणाल्या समोरील उमेदवाराच्या आईने माझ्यावर टीका करताना मला त्यांनी केलेली विकास कामे दिसत नाहीत कारण मी गांधारी आहे अशी टीका केली ठीक आहे मी विरोधक असल्याने गांधारीची उपमा दिली पण उन्हाळ्यात शेतीला पाणी मिळत नाही,रोजगार नाही,एमआयडीसी नाही, साकळाई उपसा सिंचन योजना झाली नाही हा जनतेचा आक्रोश आहे ते नाराजी दाखवत आहेत त्या जनतेला तुम्ही कोणती उपमा देणार? त्यांना काय उत्तरे देणार? असा सवाल केला तसेच भाजप उमेदवार स्वतः ची उमेदवारी महीला सन्मान,युवक सन्मान,साठी असल्याचे सांगत आहे तर दुसरीकडे आईला मिळालेली उमेदवारी रद्द करून स्वतः साठी घेतली हाच का तुमचा महीला सन्मान,घरात चुलत भावाला सरपंच करण्या ऐवजी सख्या भावाला उमेदवारी दिली हाच का युवकांचा सन्मान,आज भाजपला उमेदवारावर विश्वास नसल्याने त्यांनी अपक्ष उमेदवार वर देखील लक्ष ठेवले पण हे दोन्ही उमेदवारांना जनता स्वीकारणार नाही असे सांगून अपक्ष उमेदवार राहुल जगताप यांच्यावर टीका करताना सौ.नागवडे म्हणाल्या राज्यात जसे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा पक्ष,चिन्ह एकनाथ शिंदे यांनी घेतले ठाकरे यांचे वडील बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो वापरला तसाच त्रास आम्हाला जगताप यांनी दिला स्व.शिवाजीराव नागवडे यांच्या मदतीने आमदार झाले पण कधी भेटायला आले नाही, स्व.शिवाजीराव नागवडे यांच्या अंत्यविधीला ,दशक्रिया विधीला सर्वात उशिरा येणारी व्यक्ती म्हणजे राहुल जगताप आणि श्रध्दांजली फ्लेक्स चे बिल नागवडे कारखान्याकडे पाठवणारी व्यक्ती राहुल जगताप एवढे त्यांचे स्व.नागवडे प्रती प्रेम आणि आता अपक्ष निवडणूक लढवताना स्व.शिवाजीराव नागवडे यांचा फोटो वापरत आहे हे बेगडी प्रेम कामी येणार नाही या उलट स्वतःला महा विकास आघाडी ची उमेदवारी मिळत असताना साजन पाचपुते यांनी मनाचा मोठेपणा दाखवत आमची शिफारस केली याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना व्हॉईस चेअरमन बाबासाहेब भोस यांनी मतदार संघात महा विकास आघाडीला अनुकूल वातावरण आहे विरोधकांनी आपले फोटो वापरले तरी जनता जागृत आहे विकास कामे कोण करू शकतो याची खात्री नागवडे रूपाने जनतेला झालेली आहे असे सांगितले. महा विकास आघाडी तील बंडखोर उमेदवार प्रचारात खा.शरद पवार,राहुल गांधी, स्व. शिवाजीराव नागवडे यांचा फोटो वापरत आहे पण उपयोग होणार नाही त्यांनी हव तर काल परवा विजयी झालेल्या डोनाल्ड ट्रम्प यांचा फोटो लावायला पाहिजे असे संजय राऊत म्हणताच हशा पिकला.

# गोळेगाव आद्य कवी महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

तालुक्यातील गोळेगाव येथे कोळी महादेव समाजाचे आराध्य दैवत आद्य कवी महर्षी वाल्मिकी ऋषी यांच्या प्रतिमेच पुजन करुन झेंडावंदन कार्यक्रमाचे अध्यक्ष शशिकांत भुसेवाड उद्योजक यांच्या शुभ हस्ते करण्यात आला आहे. सदर,शशिकांत भुसेवाड ,दिगांबर जगताप श्रीकांत दारेबोईनवाड यांच्यासह गावातील चिमुकल्याच बहारदार भाषणे झाली. रामायणाचे लेखक वाल्मिकीजी हे वास्तवात एक डाकू होते. वाल्मिकी जयंती म्हणजे या दिवशी महान लेखक वाल्मिकी जी यांचा जन्म झाला .रामायण या महान ग्रंथाचे रचयिते ऋषी वाल्मिकी होते. वाल्मिकीजींचा जन्म अश्विन महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी झाला होता, या दिवसाला हिंदू धार्मिक दिनदर्शिकेत वाल्मिकी जयंती म्हणतात . यंदा वाल्मिकी जयंती १७ ऑक्टोबर रोजी साजरी होणार आहे.वाल्मिकीजींच्या जीवनातून खूप काही शिकण्यासारखे आहे, त्यांचे व्यक्तिमत्व सामान्य नव्हते. त्यांच्या आयुष्यातील एका घटनेने प्रेरित होऊन, त्याने आपला जीवन मार्ग बदलला,

महर्षि वाल्मिकीं यांचे नाव रत्नाकर होते आणि ते जंगलात राहणाऱ्या भिल्ल जातीत वाढले होते, त्यामुळे त्यांनी भिल्लांची परंपरा स्वीकारली आणि उपजीविकेसाठी ते डाकू बनले. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी ते रस्त्यावरून जाणाऱ्यांना लुटायचे आणि गरज पडेल तेव्हा मारायचे एके दिवशी महर्षी नारद मुनी जंगलातून जात असताना डाकू रत्नाकरने त्यांना बांधून ठेवले. महर्षी नारद



मुनींनी डाकूला विचारले तू अशी पाप कशाला करतो. त्यावर त्याने उत्तर दिले. मी माझ्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करतो. यावर महर्षी नारदमुनी म्हणाले , ज्यांच्यासाठी तू हे सर्व पाप करत आहेस ते तुझ्या या पापात भागीदार होणार का? या वर रत्नाकरने उत्तर दिले हो करणार , ते नेहमी माझ्या पाठीशी उभे राहणार. यावर नारद मुनी म्हणाले, एकदा तू तुझ्या कुटुंबियांना तरी विचार असे झाले तर मी तुला माझी संपत्ती देईन.

रत्नाकरने आपल्या नातेवाईकांना आणि मित्रांना माझा साथ देणार का असे विचारल्यावर सर्वांनी नकार दिला.त्यांनी पहिला श्लोक कसा रचला? एकदा ते गंगा नदीच्या काठी तपश्चर्येसाठी गेले असता एका पक्ष्याचे जोडपे प्रणय लीला करत असताना एका शिकारीने बाण मारून त्या नर पक्ष्याला ठार मारले.ते दृश्य पाहून त्याच्या मुखातून आपोआप एक श्लोक निघाला जो पुढीलप्रमाणे होता-

मां निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः।
यत्क्रौंचमिथुनादेकम् अवधीः काममोहितम्।।

अर्थ : ज्या दुष्टाने हे घृणास्पद कृत्य केले त्याला जीवनात कधीही सुख मिळणार नाही.त्या दुष्टाने प्रेमात पडलेल्या पक्ष्याचा वध केला आहे. यानंतर महान कवीने रामायण रचले,यावेळी,जिल्हाध्यक्ष दिलीप रेनेवाड,पत्रकार उद्धव मामडे, मा.मुख्याध्यापक बोईनवाड सर, दिगांबर जगताप धानोरकर,श्रीकांत दारेबोईनवाड, सरपंच बालाजी नासलवाड वाघाळेकर,नालाजी गुंडेवाड उपसरपंच सदाशिव पाटील कोळेकर,बिट जमादार बि.एम.जाधव साहेब,रामचंद्र जाधव सर,दता कोपलवाड सर,अध्यक्ष माधव यलमलवाड उपाध्यक्ष रामदास पुनेबोईनवाड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह समाज बांधव उपस्थित होते.

# प्रचारामध्ये महिलासंदर्भात आक्षेपार्ह टिप्पणी नको बालकांचा वापर ही नको ;जिल्हा प्रशासनाचे निर्देश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

भारत निवडणूक आयोगाने आचारसंहितेमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे निवडणूक प्रचारादरम्यान महिलांचा सन्मान राखला गेला पाहिजे. प्रचारादरम्यान महिलांसंदर्भात कोणतीही आक्षेपार्ह टिप्पणी करण्यात येऊ नये, तसेच मुलांचा वापर प्रचारामध्ये कुठेही होणार नाही. याची सर्व राजकीय पक्षानी तसेच उमेदवारांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्यात येत असून अशा वेळी प्रचारासंदर्भातील आदर्श आचारसंहितेचे पालन करणे अत्यावश्यक आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज या संदर्भात प्रशासनातर्फे सर्व उमेदवारांना तसेच राजकीय पक्षांना याबाबत सूचना केली आहे.

अनेक ठिकाणी प्रचारामध्ये शाळकरी मुलांचा किंवा लहान मुलांचा अनावधानाने वापर केला जातो मात्र हा आचारसंहितेचा भंग ठरतो. यासंदर्भात तक्रारी आल्यास त्यावर कारवाई केली जाते. त्यामुळे उमेदवारांनी आपल्या प्रचारामध्ये कुठेही लहान मुलांचा वापर होणार नाही, याची काळजी घ्यावी. उमेदवारांनी प्रचारादरम्यान आपली उपलब्धी आपले भविष्यातील नियोजन सांगताना कुठेही महिलांबाबत आपत्तीजनक टिप्पणी अजानतेपणे का होईना सार्वजनिक होणार नाही, याची काळजी घ्यावी. महिलांसंदर्भातील अनावश्यक टिप्पणी, अनादर अपमानजनक शब्द, लज्जा निर्माण होईल असे शब्द वापरल्यास आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहे. त्यामुळे यासंदर्भात काळजी घ्यावी. असे आवाहनही त्यांनी केले आहे.



महायुतीच्या प्रचारानिमित्त फिल्म सिटी चे प्रसिद्ध सिने अभिनेते गोविंदा नांदेड येथे आले असता सदिच्छा भेट घेऊन स्वागत करताना मा.एकनाथ शिंदे गटाचे शिवसेनेचे नेते आ. हेमंत भाऊ पाटील सोबत महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य व्यंकटराव मोकले .

# ईडीच्या भीतीने भाजपसोबत गेलो नाही छगन भुजबळ यांनी दावा फेटाळला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

ईडीच्या भीतीने भाजपसोबत गेलो नाही, तर विकासासाठी आम्ही महायुतीसोबत गेलो. राजदीप सरदेसाई यांनी लिहिलेले पुस्तक मी स्वत: वाचणार आहे. माझ्या वकीलांनादेखील देणार असून निवडणुकीनंतर यावर काय कारवाई करता येईल ते बघून कारवाई करणार आहे, असा इशाराही भुजबळांनी दिला. मी कुठलीही मुलाखत लोकसत्ताला दिली नाही. महाराष्ट्र सदन प्रकरणी उद्धव ठाकरे यांचे सरकार असताना क्लीनचीट मिळाली, तेव्हा मी उद्धव ठाकरे आणि शरद पवारांना पेढे देखील दिले. आम्ही काही जेलमध्ये जाण्याच्या भीतीने सरकारमध्ये गेलो नसल्याचे स्पष्टीकरणही त्यांनी दिले. सरदेसाई यांच्या पुस्तकांमधील दाव्याबद्दल भुजबळांकडून खरे खोटे करण्यात आले असून आपण अशी कोणतीही मुलाखत दिलेली नसून या प्रकरणी निवडणुकीनंतर कारवाई करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. विकासासाठी सरकारसोबत गेलो आहे. मी कुठलीही मुलाखत दिलेली नाही. आक्षेपार्ह दाव्यावर कारवाई केली जाईल. निवडणुकीच्या काळातच पुस्तक का आले? असा सवाल छगन भुजबळ यांनी उपस्थित केला आहे.राजदीप सरदेसाई यांच्या पुस्तकात भाजपसोबत महायुती सरकारमध्ये सामील होण्याचा एकच अर्थ म्हणजे ईडीपासून सुटका, असे छगन भुजबळ यांनी म्हटल्याचा दावा करण्यात आला आहे. तर ओबीसी असल्यामुळेच माझ्यावर ईडीची कारवाई झाली, असे अनेक प्रकारचे खुलासे भुजबळ यांनी केले आहेत असे वृत्त आहे. सुनेत्रा पवारांच्या अटकेच्या शक्यतेने अजित पवारांना घाम फुटला होता, असा दावाही या पुस्तकात केला आहे.भुजबळ पुढे म्हणाले की, 'पत्रकार राजदीप सरदेसाई यांचे पुस्तक मी पाहिलेले किंवा वाचलेले नाही. तसेच, या पुस्तकात काय प्रसिद्ध झालेले आहे ते सुद्धा मी पाहिलेले नाही. मात्र, हे पुस्तक मी घेणार आहे. तसेच, माझ्या वकीलांनाही देणार आहे. त्यानंतर वकीलांशी चर्चा करुन मी पुढील योग्य ती कार्यवाही करणार आहे. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर असे का छापले? त्यांचा उद्देश काय आहे?' असा प्रश्नही भुजबळ यांनी उपस्थित केला.ईडीच्या कारवाईबाबत बोलताना भुजबळ यांनी सांगितले की, 'राष्ट्रवादी काँग्रेसचे आम्ही ५४ आमदार आहोत. या सर्वांवरच ईडीने कारवाई केलेली नाही. त्यामुळे शंका निरर्थक ठरते. तसेच, ईडीची कारवाई ही काही विशिष्ट समाजाच्या नेत्यांवरच झाली असे म्हणणेही चुकीचे आहे. महायुती सरकारने अतिशय दमदार कामगिरी केली आहे. मतदारसंघांमध्ये कोट्यवधींची कामे होताना पाहून जनताही खुष आहे. जनतेला विकास हवा आहे. निवडणुकीत जनता महायुतीच्या बाजूने आहे, असेही भुजबळ यांनी ठामपणे सांगितले.

# माझ्या जीवनात असा विकासमय विकास करणारा कार्यसम्राट आ.तानाजीराव मुटकुळे पहिल्यांदा पाहिले

## सेनगाव नगरसेवक तथा गटनेते अमोलभैया तिडके

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी आपल्या दहा वर्षाच्या कार्य काळामध्ये विविध योजना आणून विधानसभेमध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामे केल्याने अमोल भैय्या तिडके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदाच हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी आपल्या मतदारसंघामध्ये खूप विकास कामे केले आहे असा आमदार माझ्या जीवनामध्ये मी पहिल्यांदा बघितला आहे हिंगोली जिल्ह्याचे कोणतेही विकास कामे असो आमदार मुटकुळे यांनी राज्य सरकारकडून कामे खेचून आणून आपल्या हिंगोली जिल्ह्याचा



विकास केला आहे, कयाधू नदीवरील कोल्हापुरी बंधारे असो, हिंगोली शहरातील विविध विकास कामे असो, गाव खेड्यातील रस्ते नाल्या असो की विविध शासकीय इमारती असो, स्वच्छता कार्य असो की, समाजसेवा असो सुखा दुःखामध्ये सर्वांना सोबत घेऊन चालणारे एकमेव आमदार तानाजीराव मुटकुळे त्यांनी विकासाचे बरेच कामे केले आहेत मी माझ्या जीवनामध्ये पहिल्यांदाच असाआमदार बघितला आहे असे सेनगाव नगरसेवक तथा गटनेते अमोल तिडके यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले येणाऱ्या विधानसभेला अशाच माणसांना विजयी करा जेणेकरून आपल्या विधानसभेच्या शहराचा ,गावचा, व गाव खेड्याचा, विकास होईल येणाऱ्या विधानसभेला मोठ्या संख्येने नागरिकांनी व महिलांनी मतदान करावे असे आव्हान नगरसेवक अमोल तिडके यांनी केले आहे,

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताह प्रारंभ

## मन्मथ स्वामींची कार्तिक पौर्णिमेची ४५० वर्षाची अखंडित परंपरा आजही कायम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

श्री मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत महादेव बाबा, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली यासारखे अनेक संत जिल्ह्यात होऊन गेले. अनेक वर्षाचा कालखंडामध्ये त्यांनी कीर्ती केली.

महाराष्ट्रामध्ये दोनच संत असे होऊन गेले की, त्यांनी संजीवन समाधी घेतली. 'संत ज्ञानेश्वर' आणि 'संत मन्मथ स्वामी' मन्मथ स्वामी यांची गेल्या ४५० वर्षां पासून कार्तिक पौर्णिमेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून 'श्रीक्षेत्र कपिलधार' महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये ओळखले जाते.श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त अखंड शिवनाम सप्ताहाचे प्रारंभ दिनांक ९-११-२०२४ रोजी करण्यात आला असून या सप्ताहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भरातून गायक, वादक तसेच शिवकिर्तनकाराचे व भाविक भक्तांची उपस्थिती असते यामध्ये भजन, शिवकिर्तन, शिवपाठ, काकडा, भारुड, श्रीची महापूजा अन्नदान व शेज आरती तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व महा प्रसादाचे आयोजन करण्यात येते. येणार्या १५ नोव्हेंबर ला त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध राज्यातून पायी दिंडीयांचे आगमन होते . तसेच अनेक राज्यातून शेकडो दिंड्या या ठिकाणी येतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक भाविक या ठिकाणी आल्यावर समाधान व्यक्त करतो. आणि सर्व समाज एकत्र करून एक विचार या ठिकाणावरून घेऊन जातात.

या सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविकभक्तांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान पंचकमेटी, श्रीक्षेत्र कपिलधार येथील पुजारी विश्वनाथ बापू स्वामी, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, वैजिनाथ महाराज शिंदे दत्तसंस्थान बालाघाट यांनी केले आहे. ४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म माघ शुद्ध पंचमी १४८२ ला झाला. जगाला पवित्र करण्याचे सामर्थ्य या वीरशैव कुळामध्ये आहे. त्याच कुळामध्ये ४५० वर्षांपूर्वी श्री मन्मथ स्वामी यांचा जन्म बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी मन्मथ स्वामी यांच्या आई पार्वती आणि वडील शिवलिंग स्वामी यांच्या पोटी झाला. मन्मथ स्वामी यांचा जन्म दिनोदर बाबा यांच्या आशीर्वादाने झाला होता. त्यांनी शिव सांप्रदायाचा पाया रोवाला तसेच लिंगायत वीरशैव साहित्याचे व समाजाचे ते जनक आहेत. भजन कीर्तन नामस्मरण ही परंपरा त्यांनी चालू केली. तसेच मन्मथ माऊलींनी शिव संप्रदायाचा पाया रचला व क्लस हा शिवसंत लक्ष्मण महाराजांनी रचला. लक्ष्मण महाराजांची समाधी जोड आष्टी येथे आहे. मन्मथ माऊलींनी पहिली ध्वज पताका खांद्यावर घेऊन कपिलधार ते शिखर शिंगणापूर पदयात्रा काढली. या ठिकाणची आख्यायिका या ठिकाणी कपिल मुनी यांचं वास्तव्य होतं. कपिल मुनी यांची गंगासागर येथे समाधी आहे. कपिल मुनी हे तपस्वी असल्यामुळे त्यांनी हे क्षेत्र दिनोदर बाबा यांच्या ओटीमध्ये टाकलं म्हणजे त्यांना दान केलं. दिनोदर बाबा हे एक तपस्वी महाराज होते. ते या ठिकाणी असलेल्या पंचकुंडाच्या ठिकाणी गुप्त झाले. त्याअगोदर दिनोदर बाबा यांनी हे तीर्थक्षेत्र मन्मथ स्वामी यांना स्वाधीन केलं होतं. मन्मथ स्वामी यांनी या ठिकाणी तपश्चर्या करून वयाच्या २६ व्या वर्षी संजीवन समाधी घेतली. संजीवनी समाधी घेणारे महाराष्ट्रातील दुसरे संत मन्मथ स्वामी यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणार्या कपिलधार या ठिकाणी गेले. ४५९ वर्षापासूनची ही परंपरा व लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. संजीवनी समाधी घेणारे हे महाराष्ट्रातील दुसरे संत म्हणून ओळखले जातात. मन्मथ स्वामी यांनी 'परम रहस्य' हा ग्रंथ कपिलधार या ठिकाणी लिहिला. त्यावेळी त्याठिकाणी दुसरं प्राणी देखील वास्तव्यास होते. अनेक वाघ, सिंह, साप या ठिकाणी वास्तव्य होते. ज्यावेळी मन्मथ स्वामी त्या ठिकाणी तपश्चर्या करत असत त्यावेळी त्यांच्या अंगा खांद्यावर साप खेळत असत असा त्यांचा अनेक वर्षापासूनचा इतिहास आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904